# वार्षिक अहवाल
## २०२४-२५









नोंदणी क्र. २२६/१४ एफ-१८५६ (गोंदिया)

# DINBANDHU
## Gramin Vikas sanstha, Deori
## दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

ता.देवरी जि.गोंदिया.

# प्रस्तावना

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी या संस्थेची संस्था नोंदणी सन-१८६० च्या अधिनीयम २१ अन्वये दि.२९ डिसेंबर २०१४ रोजी धर्मदाय संस्था म्हणुन सहाय्यक धर्मदाय निबंधक गोंदिया यांच्याकडे नोंदणीकृत झाली. दिनबंधु ग्रामीण विकास संस्था ही स्वयंसेवी सामाजीक संस्था असल्याने ना नफा-ना तोटा या तत्वानुसार ही संस्था सामाजिक क्षेत्रात जनसामान्यांसाठी विविध लोकाभिमुख कार्य करीत आहे.

आर्थिक वर्ष २०२४–२०२५ या वर्षात प्रामुख्याने रोजगार व स्वयंरोजगार, आरोग्य, स्वच्छता, आर्थिक, सांस्कृतिक असे सामाजीक दायीत्व या विषयांवर संस्थेने कार्य केले आहे. या वर्षात संस्थेने या विषयांवर कार्य करत असतांना संस्थेला आता पर्यंत मिळालेल्या कार्याची फलश्रृती एका वेगळया रुपात दिसुन आली असल्याने संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांचा आनंद आणि उत्साह द्विगुणीत झाला आहे.

दिवसेदिवस होत असलेल्या प्रगतीमागे जनसामांन्याकडुन मिळालेले सहकार्य आणि आशिर्वाद आहेत. ते उत्तरोत्तर निरंतर मिळत राहावे अशी संस्थेच्या विस्वस्त मंडळाकडुन प्रार्थना आहे.

“सेवेने अंगी सामर्थ्य येते ।<br>
जे जे बोलाल तेची होते ।<br>
हस्ते परहस्ते सर्वची होते ।<br>
काम त्याचे ।।”

– ग्रामगीता

# अध्यक्षांचे मनोगत

सप्रेम नमस्कार...

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी या संस्थेचा सन २०२४–२०२५ या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करत असतांना आम्हाला अतीशय आनंद होतो आहे त्याचे कारण असे की संस्था विविध क्षेत्रात सामाजीक उपक्रमाचे आयोजन करत असते परंतु या वर्षात कार्य करत असतांना काही विशिष्ट क्षेत्रात संस्थेला कार्य कराव लागल.

संस्था स्थापनेपासुन अनेक विषयात कार्य करत आलेली आहे. परंतु या आर्थिक वर्षात संस्थेचे प्रमुख लक्ष केंद्रीत कसलेले शिक्षण या क्षेत्रासोबत स्वच्छता, आरोग्य, रोजगार, क्रीडा व सांस्कृतिक आणि इतर सामाजिक क्षेत्रात समाजाची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी काय करता येईल अशा क्षेत्रात संस्थेनी या वर्षात कार्य केलेले आहे.

प्रत्येक वर्षात वेगवेगळया उपक्रमांना संस्थेला जनसामान्यांचे मिळणारे सहकार्य व प्रेम यात वाढ होत असुन आम्ही हाती घेत असलेल्या सर्व उपक्रमांना असाच प्रतिसाद मिळत राहील हीच अपेक्षा !

ग्रामसुधारणेचे मुलमंत्र । सज्जनांनी व्हावे एकत्र ।
संघठन हेची शक्तीचे सुत्र । ग्रामराज्य निर्माण करी ।।

आपला विश्वासू

कुलदिप द. लांजेवार
अध्यक्ष
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

# संस्थेविषयी....

संस्थेचे नांव : दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी
नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र-२२६/१४ (गोंदिया), संस्था अधिनीयम, १८६० नियम २१ एफ-१८५६ (गोंदिया), मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० नियम २९
संस्थेचे पॅन क्रमांक : AADTD6124H
कार्यालयाचा पत्ता : C/o. श्री. दयारामजी लांजेवार, शेंडेपार रोड, पंचशिल चौक, देवरी ता. देवरी, जि. गोंदिया ४४१९०१ (महा.)
संपर्क क्रमांक : ७२१८९४२६२६, E-Mail : dgvsdeori@gmail.com
वेबसाईट : www.dinbandhugraminvikassanstha.org

## संस्थेचे उद्देश :

१) आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम भागातील जन सामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मदत करणे.
२) सुशिक्षीत बेरोजगार ग्रामीण युवकांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.
३) आदिवासी व इतर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणुन त्यांना स्पर्धा परिक्षेच्या संदर्भात सर्वतोपरी मदत करुन प्रशासकीय सेवेत रुजु होण्यासाठी सक्षम करणे.
४) ग्रामीण व नागरी क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी कृषि, आरोग्य, शिक्षण, मुलभुत अधिकार या सारख्या लोकाभिमूख विषयांवर जनजागृती करुन नागरीकांना विकासाच्या प्रवाहात आणणे.
५) प्रशासनासोबत राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन, जनहितार्थ कार्यक्रमांचे आयोजन करणे.

## संस्थेची विशेषता :

१) आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम भागातील जन सामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दुर करण्यासाठी संस्था निरंतर मदत करीत आहे.
२) सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांसाठी संस्थेने अनेक रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले तसेच ते कार्य पुढेही सुरु राहील असे संस्थेचे ध्येय आहे.
३) स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व मदतीसह योग्य तज्ञांचे मार्गदर्शन मिळवुन देण्यासाठी संस्था सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.
४) प्रशासनासोबत जनसामान्यांसाठी आयोजीत कार्यक्रमात संस्था नेहमीच सहभागी होवून यशस्वी कार्यक्रम करण्यासाठी सहकार्य करीत असते.
५) नैसर्गीक साधन संपत्तीचे जतन करणे तसेच शिक्षण, आरोग्य, जलसंवर्धन, ग्रामस्वच्छता या विषयांवर नियमीत मार्गदर्शन करीत राहाणे, जनजागृती करणे हे संस्थेचे प्रमुख कार्य आहे.

## शिक्षण-सामाजिक :

### १) ''डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती : दि.१४ एप्रिल २०२४

स्थान :- सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्र, देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था अंतर्गत दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ''सलग ४ तास वाचन करून बाबासाहेबांना अभिवादन'' या कृतिशील अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे वाचन करून त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी विचारांचा प्रसार करणे. युवक व विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि ज्ञानार्जनाची प्रेरणा देणे.भारतीय संविधान, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांविषयी जागरूकता निर्माण करणे.समाजातील सर्व घटकांमध्ये बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व समजावून देणे.वाचन संस्कृतीला चालना देत समाज परिवर्तनासाठी विचारांची प्रेरणा देणे. बाबासाहेबांना केवळ अभिवादन न करता त्यांच्या विचारांचे आचरणात रूपांतर करण्याचा संदेश देणे. या उपक्रमाच्या माध्यमातून वाचन संस्कृतीचा प्रसार होऊन समाजात ज्ञान, समता आणि प्रबोधनाची चळवळ अधिक बळकट करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.उमेश काशिद, प्रकल्प अधिकारी, देवरी., मा.श्री.कपील शर्मा, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, देवरी.

**आयोजनाचे साफल्य:**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था अंतर्गत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ''सलग ४ तास वाचन करून बाबासाहेबांना कृतीशील अभिवादन'' या अभिनव उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी, युवकांनी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे व विचारांचे वाचन केले. बाबासाहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरला. या माध्यमातून युवक व विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीची जाणीव निर्माण झाली तसेच भारतीय संविधानातील समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यास मोठी मदत झाली. बाबासाहेबांना केवळ अभिवादन न करता त्यांच्या विचारांचे आचरणात रूपांतर करण्याचा संदेश देणारा हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून समाजात ज्ञान, समता आणि प्रबोधनाची चळवळ अधिक बळकट करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे.



## आरोग्य :

### २) आंतरराष्ट्रीय योगदिवस :

दि.२१ जुन २०२४

स्थान :- तालुका क्रिडा संकुल, देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

तालुका क्रीडा संकुल समिती देवरी आणि दिनबंधु ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण व आदिवासी भागातील नागरीकांमध्ये योग, प्राणायम व ध्यान या बद्दल जागरुकता निर्माण करुन त्यांना दैनंदिन जिवनात योगाचा अवलंब करण्यास प्रेरीत करणे, आरोग्यदायी सवयी विकसीत करणे आणि समाजात सकारात्मक व निरोगी वातावरण निर्माण करणे हा या कार्यक्रमाच्या आयोजनाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाच्या माध्यमातुन युवकांमध्ये आरोग्याबाबत जागरुकता वाढवुन समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालणा देणे हा देखील संस्थेचा महत्वपुर्ण हेतु आहे.

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.सचिन धात्रक, वनपरीक्षेत्राधिकारी, देवरी.

मा.श्री.आनंद घाडगे, पोलीस उपनिरीक्षक, देवरी.

मा.कु.गिता मुळे, पोलीस उपनिरीक्षक, देवरी.

**आयोजनाचे साफल्य :**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि तालुका क्रीडा संकुल समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित योग कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमात विविध वयोगटातील नागरिक, युवक-युवती, महिला तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून योगाचे विविध आसन व प्राणायामाचा सराव केला. योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे समाजामध्ये निरोगी जीवनशैलीचा संदेश देत नियमित योगाभ्यास करण्याची प्रेरणा सहभागी नागरिकांना मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व सहभागी, मार्गदर्शक आणि सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आभार व्यक्त करण्यात आले.






क्रीडा व युवक सेवा संचालनालय म. रा. पुणे अंतर्गत तालुका क्रीडा
संकुल समिती देवरी आणि दिनबंधू ग्रामीण विकास संस्था, देवरी
जि. गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत
आंतरराष्ट्रीय
योग दिवस
दिनांक : २१ जून २०२४ रोज शुक्रवार
वेळ : सकाळी ६.३० वाजता
स्थळ : तालुका क्रीडा संकुल देवरी, जि. गोंदिया



# काही क्षणचित्रे



## तालुका क्रीडा संकुल येथे योग दिन



**देवरी** : आजच्या धकाधकीच्या मानवी जीवनातील दैनंदिन जीवन शारीरिक आणि मानसिक रित्या सुदृढ रहाण्यासाठी आजच्या घडीला दैनंदिन प्राणायाम आणि योगाअभ्यास करणे ही काळाची गरज झाली असून ती कायम करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सेवानिवृत्त मुख्याध्यापक राम गायधने यांनी केले.

ते स्थानिक देवरी येथील तालुका क्रीडा संकुल येथे क्रीडा व युवक संचालनालय म. रा. पुणे अंतर्गत तालुका क्रीडा संकुल समिती देवरी आणि दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या' समारोह प्रसंगी केले. कार्यक्रमाच्या उद्धघाटन सत्राचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन उत्तर देवरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन धात्रक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी विशेष अतिथी म्हणून पोलीस उपमुख्यालय देवरी कॅम्प येथील नक्षल सेल प्रभारी आनंद घाडगे, पोलीस उपनिरीक्षक गीता मुळे, योग शिक्षिका मनीषा मडावी, दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदिप लांजेवार, विश्वस्त चेतन उईके यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक चेतन उईके यांनी तर संचालन प्रदीप रामटेके आणि आभार कुलदिप लांजेवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिपक लांजेवार, किरण रामटेके, सीतेश ईश्वर, मनोज कोडापे, कुलदिप बघेले, संजय तरोणे, टीकाराम मातवारे, विनोद चौधरी, तालुका क्रीडा संकुलचे क्रीडा मार्गदर्शक रवी काळे, स्वपनील ठाकरे, चंद्रभान बगवा, संतोष चनाप, आशा पटले यांच्या सह संस्थेच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

## अच्छा स्वास्थ्य बनाए रखना समय की मांग : गायधने



**देवरी (त.सं).** आज के तनावपूर्ण जीवन में शारीरिक व मानसिक रूप से स्वस्थ रहने के लिए प्रतिदिन प्राणायाम व योगाभ्यास समय की मांग बन गई है, ऐसे विचार सेवानिवृत्त प्रधानाध्यापक राम गायधने ने महाराष्ट्र पुणे अंतर्गत तहसील क्रीड़ा संकुल देवरी और दीनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी द्वारा 'अंतरराष्ट्रीय योग दिवस'के अवसर पर तहसील क्रीड़ा संकुल देवरी में आयोजित योग दिवस पर व्यक्त किए. उद्घाटन उत्तर देवरी के वन क्षेत्र अधिकारी सचिन धात्रक ने दीप प्रज्वलित कर किया. इस अवसर पर विशेष अतिथि के रूप में पुलिस उप मुख्यालय देवरी कैंप के नक्सल सेल प्रभारी आनंद घाडगे, पुलिस उपनिरीक्षक गीता मुले, योग शिक्षिका मनीषा मडावी, दीनबंधु ग्रामीण विकास संघ के अध्यक्ष कुलदीप लांजेवार, चेतन उइके उपस्थित थे. प्रस्तावना चेतन उइके ने रखी. संचालन प्रदीप रामटेके ने किया व आभार कुलदीप लांजेवार ने माना. सफलतार्थ नक्सल सेल देवरी, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था के दीपक कोडापे, कुलदिप बघेले, संजय तरोणे, टीकाराम मातवारे, विनोद चौधरी, तहसील क्रीड़ा संकुल के क्रीड़ा मार्गदर्शक रवि काले, स्वप्निल ठाकरे, चंद्रभान बगवा, संतोष चनाप, आशा पटले ने प्रयास किया.






## शिक्षण व सामाजिक :-

### ३) शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण :

दि.२८ सप्टेंबर २०२४

स्थान :- जि.प.प्राथमिक शाळा, रोपा, ढोडरा, सुकळी, रामगड, मगरडोह, टेकरी, बाळापुर

**आयोजनाचे उद्देश :**

आदिवासी बहुल नक्षलग्रस्त क्षेत्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय जीवनात आवश्यक असलेल्या शालेय साहित्याची उपलब्धता करून देणे, त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक मदत मिळावी हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे, शाळेत नियमित उपस्थिती वाढवणे आणि ग्रामीण व आदिवासी भागातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सकारात्मक वातावरण तयार करणे हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.संतोष गुट्टे, पोलीस उपनिरीक्षक, ए.ओ.पी.मगरडोह

मा.श्री.विलास शिंदे, तालुका प्रतिनीधी, दैनीक लोकमत

मा.श्री.युगेशकुमार बिसेन, सामाजिक कार्यकर्ता, देवरी

मा.श्री.कुलदिप लांजेवार, अध्यक्ष दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सशस्त्र दूरक्षेत्र मगरडोह यांच्या संयुक्त विद्यमाने गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यातील आदिवासी बहुल नक्षलग्रस्त भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वितरण करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सिल, व इतर आवश्यक शालेय साहित्य देण्यात आले. या कार्यक्रमाला शिक्षक, पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शालेय साहित्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आनंद व उत्साह निर्माण झाला तसेच नियमितपणे शाळेत उपस्थित राहण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळाली.या उपक्रमामुळे आदिवासी बहुल क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लागला असून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. संस्था पदाधिकारी, शिक्षक व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# काही क्षणचित्रे








**देशोन्नती**

# अतिदुर्गम भागातील शालेय चिमुकल्यांना मदतीचा हात

## १२२ विद्यार्थ्यांना शालेयपयोगी साहित्याचे वितरण



**देवरी :** देवरी तालुक्यातील अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागात असलेल्या जिल्हा पोलीस दल गोंदिया अंतर्गत सशस्त्र दुरक्षेत्र मगरडोह भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी या साठी देवरी येथील दिनबंधु ग्रामीण विकास संस्था तसेच जिल्हा पोलीस दल गोंदिया अंतर्गत सशस्त्र दुरक्षेत्र मगरडोह यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा पोलीस दलाच्या दादालोरा एक खिडकी-एक हात मदतीचा या उपक्रमा अंतर्गत जिल्हा परिषद च्या अतिदुर्गम भागात वसलेल्या ५ शाळांच्या १२२ विद्यार्थ्यांना वर्षभर उपयोगी पडेल इतक्या शालेय साहित्याचे वितरण दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सशस्त्र दुरक्षेत्र मगरडोह यांच्या वतीने करण्यात आले.

यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रोपा, ढोडरा, सुकडी, रामगड, मगरडोह या शाळांचा समावेश आहे. असून या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा, उपविभागीय पोलीस अधिकारी विवेक पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली ... कुलदिप लांजेवार यांच्यासह सशस्त्र दुरक्षेत्र मगरडोह चे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक संतोष गुट्टे, सामाजिक कार्यकर्ता संदीप महोबिया, युगेश बिसेन, संस्थेचे विश्वस्त दिपक लांजेवार यांच्या हस्ते या सर्व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण करण्यात आले यासोबतच उपस्थित सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांना उपस्थितीतांनि शैक्षणिक विकासाबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांना अंकलिपि, नोटबुक, चित्रकला वही, पेन, पेन्सिल, इतर शालेय वस्तू मिळताच त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद द्विगुणित झाला होता.

शालेय साहित्य वितरणवेळी ग्राम पंचायत सुकडी चे सरपंच कामेश्वर कल्लो, पोलीस पाटील मोरेश्वर पुराम, सामाजिक कार्यकर्ते भीमराव ताराम, सर्व जि.प. शाळांचे मुख्याध्यापक एम.सी.हुंडरा, व्ही.एम. खोब्रागडे, कु. एस. सी. कुंभरे, एस.एम. घळे, वाय.एस. गाढवे यांच्यासह सर्व ठिकाणातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचे स्वयंसेवक, पोलीस कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थांनी सहकार्य केले.



**लोकमत**

# अतिदुर्गम भागातील शालेय चिमुकल्यांना मदतीचा हात



लोकमत न्यूज नेटवर्क

**देवरी :** जिल्हा पोलिस दल गोंदियाअंतर्गत सशस्त्र दूरक्षेत्र मगरडोह भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी दिनबंधू ग्रामीण विकास संस्था व सशस्त्र दूरक्षेत्र मगरडोह यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा पोलिस दलाच्या दादालोरा एक खिडकी-एक हात मदतीचा या उपक्रम राबविण्यात आला. याअंतर्गत जि. प.च्या अतिदुर्गम भागातील ५ शाळांच्या १२२ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप शनिवारी (दि.२८) करण्यात आले.

यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रोपा, ढोडरा, सुकडी, रामगड, मगरडोह या शाळांच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. जिल्हा पोलिस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा, उपविभागीय पोलिस अधिकारी विवेक पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली व दिनबंधू संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार यांच्यासह सशस्त्र दूरक्षेत्र मगरडोहचे प्रभारी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक संतोष गुट्टे, लोकमत तालुका प्रतिनिधी विलास शिंदे, सामाजिक कार्यकर्ता संदीप महोबिया, युगेश बिसेन, संस्थेचे विश्वस्त दीपक लांजेवार यांच्या हस्ते या सर्व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना अंकलिपी, नोटबुक, चित्रकला वही, पेन, पेन्सिल, इतर शालेय वस्तू मिळताच त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद द्विगुणित झाला होता.

यावेळी सरपंच कामेश्वर कल्लो, पोलिस पाटील मोरेश्वर पुराम, सामाजिक कार्यकर्ते भीमराव ताराम, सर्व जि. प. शाळांचे मुख्याध्यापक एम. सी. हुंडरा, व्ही. एम. खोब्रागडे, एस. सी. कुंभरे, एस. एम. घळे, वाय. एस. गाढवे उपस्थित होते.

Hello Gondia
Page No. 2 Sep 29, 2024
Powered by: erelego.com



## शिक्षण व सामाजिक :

### ४) ‘‘BAMS च्या पदवी अभ्यासक्रमाकरीता आर्थिक मदत’’ :

दि.०८ आक्टोबर २०२४

सीान :- ग्राम-सिरदारटोला (कन्हाळगांव)

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था तर्फे गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यातील आदिवासी बहुल भागातील अनुसूचित जमातीच्या चि.डीलेश्वर सलामे या विद्यार्थ्याला BAMS शिक्षणाच्या प्रवेशाकरिता आर्थिक मदत देण्यामागील उद्देश म्हणजे आर्थिक अडचणीमुळे गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण थांबू नये.या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, त्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी प्रोत्साहन देणे तसेच समाजातील दुर्बल घटकातील युवकांना उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी आधार देणे हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे. तसेच शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सक्षम व सेवाभावी वैद्यकीय तज्ञ घडवून समाजाच्या आरोग्य सेवेत योगदान देण्याची प्रेरणा निर्माण करणे हाही या उपक्रमाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

**उपस्थिती मान्यवर :**

मा.श्री.कुलदिप लांजेवार, अध्यक्ष, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी

मा.श्री.चेतन उईके, विश्वस्त दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी

मा.श्री.टी.के.मातवारे, स.शि.जि.प.प्राथ.शाळा फुटाना

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था तर्फे आदिवासी बहुल भागातील अनुसूचित जमातीच्या एका होतकरू विद्यार्थ्याला BAMS पदवी शिक्षणाच्या प्रवेशाकरिता ११,०००/- इतकी आर्थिक मदत प्रदान करण्यात आली.या उपक्रमाच्या माध्यमातून आर्थिक अडचणी असूनही उच्च शिक्षण घेण्याची जिद्द असलेल्या विद्यार्थ्याला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. संस्थेच्या या मदतीमुळे विद्यार्थ्याला वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने पुढे जाण्यासाठी आधार मिळाला. या सामाजिक उपक्रमामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळत असून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. संस्थेच्या या कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

# नवराष्ट्र

## वैद्यकीय शिक्षणासाठी डिलेश्वरला मदतीचा हात

### दीनबंधू ग्रामीण विकास संस्थेतर्फे आर्थिक सहाय्य

गोंदिया, ब्युरो. जिल्ह्यातील आदिवासीबहुल नक्षलग्रस्त भाग असलेल्या देवरी तालुक्यातील कन्हाळगाव ग्रामपंचायत अंतर्गत सिरदारटोला येथील डिलेश्वर चमरू सलामे या विद्यार्थ्याची बीएएमएसकरिता निवड झाली. मात्र घरची परिस्थिती बेताची असल्याने दीनबंधू ग्रामीण विकास संस्थेने त्याला पुढील शिक्षणासाठी आर्थिक मदत केली.

डिलेश्वरने इयत्ता 1 ते 7 वी पर्यंतचे शिक्षण स्थानिक जिल्हा परिषदेच्या शाळेत पूर्ण करून पुढील 8 ते 12 वीचे शिक्षण शासकीय आदिवासी वसतिगृहात राहून केले. मुळात डीलेश्वरला वैद्यकीय क्षेत्रात आवड असल्यामुळे त्याने त्याच क्षेत्रात पुढे जाण्याचे ध्येय ठरविले आणि शेवटी वैद्यकीय शिक्षणाच्या अभ्याक्रमाच्या प्रवेशासाठी तो पात्र ठरला. त्याच्या कुटुंबात आई-वडील, मोठी बहीण, भाऊ आहे. आई-वडील मिळेल ते मजुरीचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असून मोठी बहीण आणि भाऊ आपल्या मेहनतीने उच्च शिक्षण घेत असल्याने तेदेखील बाहेरगावीच असतात. वैद्यकीय प्रवेशासाठी आवश्यक नीट परीक्षेत यश संपादन करण्यासाठी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्याने कुठलेही अवांतर शिकवणी वर्गाची मदत न घेता 2024 या वर्षात नीत परीक्षेत गुणांकन मिळवून वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमातील बीएएमएस पदवीचे शिक्षणासाठी तो पात्र ठरला आणि तिसऱ्या फेरीअखेर त्याचा अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा ...



#### कौटुंबिक परिस्थितीमुळे आर्थिक अडचण

डिलेश्वरला प्रवेशासाठी 1 लाख 60 हजार इतकी रक्कम भरायची होती. परंतु तुटपुंजे उत्पन्न असलेल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्याने तो अडचणीत सापडला. परंतु त्याने हिमत न हारता प्राथमिक शिक्षण घेतलेल्या शाळेचे शिक्षक टी. के. मातवारे यांना अडचण सांगितली. त्यांनी त्याच्या संकटात मदतीला धावून जाणाऱ्या मित्र मंडळाच्या सहकार्याने प्रवेश शुल्काच्या 75 टक्के रक्कम गोळा करून त्याला दिली. दीनबंधू ग्रामीण विका... 7 ऑक्टोबरला डिलेश्वरचे घर गाठून आर्थिक मदतीचा ...

Gondia Plus Edition
Oct 15, 2024 Page No. 2
Powered by: NavaRashtra.com

# लोकमत

शिक्षण

विलास शिंदे, देवरी

## आदिवासीबहुल भागातील डिलेश्वर सलामे होणार डॉक्टर

### प्रतिकूल परिस्थितीवर केली मात : दानदात्यांनी दिला मदतीचा हात

ठरविलेले ध्येय गाठण्यासाठी मेहनत, चिकाटी ठेवून जिद्दीने पाठलाग केला की, कितीही प्रतिकूल परिस्थिती असली, तरी त्यावर मात करून ध्येय गाठता येते. हीच बाब देवरी तालुक्यातील आदिवासीबहुल दुर्गम भागातील कन्हाळगाव ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या सिरदारटोला येथील डिलेश्वर चमरु सलामे या विद्यार्थ्याने सिद्ध करून दाखविले. त्याची निवड बीएएमएस वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी झाली असून, तो आता डॉक्टर होणार आहे. ही तालुक्यासाठी नव्हे, तर जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे.

त्यांच्या मदतीने होणार डिलेश्वरचे स्वप्न पूर्ण

Oct 14, 2024

# देशोन्नती

## वैद्यकीय शिक्षणासाठी डिलेश्वरला मदतीचा हात

### दीनबंधू ग्रामीण विकास संस्थेतर्फे आर्थिक सहाय्य



देशोन्नती वृत्तसंकलन

गोंदिया : जिल्ह्यातील आदिवासीबहुल नक्षलग्रस्त ...ाग असलेल्या देवरी तालुक्यातील कन्हाळगाव ...ामपंचायत अंतर्गत सिरदारटोला येथील डिलेश्वर ...रू सलामे या विद्यार्थ्यांची बीएएमएसकरिता निवड ...ली. मात्र घरची परिस्थिती बेताची असल्याने ...बंधू ग्रामीण विकास संस्थेने त्याला पुढील ...णासाठी आर्थिक मदत केली.

...डेलेश्वरने इयत्ता १ ते ७ वी पर्यंतचे शिक्षण ...क जिल्हा परिषदेच्या शाळेत पूर्ण करून पुढील ८ ...चे शिक्षण शासकीय आदिवासी वसतिगृहात ...ले. मुळात डीलेश्वरला वैद्यकीय क्षेत्रात आवड ...ळे त्याने त्याच क्षेत्रात पुढे जाण्याचे ध्येय ... आणि शेवटी वैद्यकीय शिक्षणाच्या ...च्या प्रवेशासाठी तो पात्र ठरला. त्याच्या ...ई-वडील, मोठी बहीण, भाऊ आहे. आई- ...ते मजुरीचे काम करून आपल्या कुटुंबाचा ...रीत असून मोठी बहीण आणि भाऊ ...तीने उच्च शिक्षण घेत असल्याने ...बाहेरगावीच असतात.

वैद्यकीय प्रवेशासाठी आवश्यक नीट परीक्षेत यश संपादन करण्यासाठी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्याने कुठलेही अवांतर शिकवणी वर्गाची मदत न घेता २०२४ या वर्षात नीत परीक्षेत गुणांकन मिळवून वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमातील बीएएमएस पदवीचे शिक्षणासाठी तो पात्र ठरला आणि तिसऱ्या फेरीअखेर त्याचा अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील पाचगाव येथील शिवाजीराव पवार आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज ॲण्ड रिसर्च सेंटरमध्ये प्रवेश निश्चित झाला.

#### कौटुंबिक परिस्थितीमुळे आर्थिक अडचण

डिलेश्वरला प्रवेशासाठी १ लाख ६० हजार इतकी रक्कम भरायची होती. परंतु तुटपुंजे उत्पन्न असलेल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्याने तो अडचणीत सापडला. परंतु त्याने हिमत न हारता प्राथमिक शिक्षण घेतलेल्या शाळेचे शिक्षक टी. के. मातवारे यांना अडचण सांगितली. त्यांनी त्याच्या संकटात मदतीला धावून जाणाऱ्या मित्र मंडळाच्या सहकार्याने प्रवेश शुल्काच्या ७५ टक्के रक्कम गोळा करून त्याला दिली. दीनबंधू ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार यांनीही ७ ऑक्टोबरला डिलेश्वरचे घर गाठून आर्थिक मदतीचा धनादेश दिला.

Gondia Edition
Oct 16, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com



## आरोग्य - सामाजीक :

### ५) ''दमा या आजारावर मोफत औषध वितरण शिबीर :

दि.१६ आक्टोंबर २०२४

सीान :- आफताब मंगल कार्यालय, देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी बहुल नक्षलग्रस्त भागात दमा या आजाराबाबत जनजागृती निर्माण करणे व दमाग्रस्त रुग्णांना आरोग्य सहाय्य मिळावे या उद्देशाने कोजागीरी पोर्णिमाचे औचीत्य साधुन मोफत औषध वितरण शिबीराचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या उपक्रमाच्या माध्यमातुन रुग्णांना आवश्यक औषध उपलब्ध करुन देत त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करणे, तसेच समाजात निरोगी जीवनशैली व आरोग्याबाबत जागरुकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख हेतु आहे.

**विशेष उपस्थिती :**

मा.श्री.संजु उईके, अध्यक्ष नगरपंचायत देवरी

मा.सौ.डॉ.सुजाता ताराम, देवरी

मा.श्री.यादोराव पंचमवार, संचालक कृषि उत्पन्न बाजार समिती देवरी

मा.श्री.डॉ.सुनिल समरीत, अध्यक्ष, सुवर्णप्राशन फाऊंडेशन

मा.कुलदिप लांजेवार, अध्यक्ष-दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागिरी पौर्णिमा निमित्त दमा (अस्थमा) या आजारावर मोफत औषध वितरण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात पूर्व विदर्भातील गोंदिया,भंडारा, नागपूर, गडचिरोली, वर्धा या जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने रुग्ण सहभागी झाले. एकूण ४५७ रुग्णांनी शिबिरात नोंदणी केली, सर्व रुग्णांची चिकित्सा करून त्यापैकी ३९७ रुग्णांना दमा या आजारावरील मोफत औषधांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक रुग्णांना उपचाराची संधी उपलब्ध झाली तसेच दमा आजाराविषयी जागरूकता वाढण्यास मदत झाली. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेले हे आरोग्य शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

# काही क्षणचित्रे










## सांस्कृतिक व सामाजिक :-

### ६) दिवाळी पहाट :- ''पहाट दिवाळीची-साथ सुरेल स्वरांची''

दि.३० आक्टोंबर २०२४

स्थान :- तालुका क्रीडा संकुल देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने धनत्रयोदशी च्या शुभमुहूर्तावर आदिवासी बहुल भागात प्रथमच "दिवाळी पहाट" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागील उद्देश म्हणजे दिवाळीच्या पावन पर्वाचे सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समाजापर्यंत पोहोचविणे तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांमध्ये सांस्कृतिक परंपरांविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, युवक-युवतींमध्ये सांस्कृतिक जाणीव वाढविणे तसेच समाजात एकोपा, बंधुभाव आणि आनंदाचे वातावरण निर्माण करणे हाही या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

**विशेष उपस्थिती :**

मा.श्री.प्रशांत संगीडवार, अध्यक्ष मॉ धुकेश्वरी मंदिर समिती देवरी

मा.श्री.डॉ.प्रशांत ठाकरे, राष्ट्रीय प्रबोधनकार

मा.श्रीमती प्रज्ञाताई संगीडवार, उपाध्यक्ष नगरपंचायत देवरी

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने धनत्रयोदशीच्या च्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्र राज्याच्या पूर्व टोकावर असलेल्या आदिवासी बहुल भागातील देवरी नगर पंचायत क्षेत्रात प्रथमच "दिवाळी पहाट" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अकोला येथील कलाकार यांनी या कार्यक्रमात पारंपरिक गीत, संगीत व सांस्कृतिक सादरीकरणांच्या माध्यमातून दिवाळीच्या सणाचा आनंद सर्वांनी अनुभवला. या अभिनव उपक्रमामुळे आदिवासी बहुल भागात सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले तसेच नागरिकांमध्ये एकोपा, बंधुभाव आणि आनंदाची भावना दृढ झाली. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल सर्व सहभागी कलाकार, मान्यवर व सहकार्य करणाऱ्या मित्र परिवाराचे आभार व्यक्त करण्यात आले.

## काही क्षणचित्रे











## सामाजिक :-

### ७) आमची दिवाळी वंचितांसाठी :

दि.०४ नोव्हेंबर २०२४
सीान :- ग्राम-पत्थराटोला, ता.सालेकसा, जि.गोंदिया

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी ''आमची दिवाळी वंचितांसाठी'' हा उपक्रम आयोजीत करण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे समाजातील गरजु, वंचित व दुर्बल घटकांपर्यंत दिवाळीच्या आनंदाचा वाटा पोहचविणे हा आहे. या उपक्रमाच्या माध्यमातुन गरजु कुटूंबाना फराळ, कपडे, मिठाई, क्रिडा व शैक्षणिक साहित्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करुन त्यांच्या आयुष्यातही दिवाळीचा आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न संस्था करत आहे. तसेच समाजातील सक्षम घटकांनी वंचित बांधवांच्या मदतीसाठी पुढे यावे व समाजात सहकार्य, संवेदनशीलता आणि समाजिक बांधिलकीची भावना वाढीस लागावी हा या उपक्रमाचा हेतु होता.

**विशेष उपस्थिती :**

मा.श्री.भोजरामजी हुड, से.नि.ग्रामविस्तार अधिकारी
मा.श्री.चेतककुमार झंजाळ, सामाजिक कार्यकर्ता देवरी
मा.श्री.विनोदजी चौधरी, संचालक, भंडारा-गोंदिया कर्मचारी पत संस्था
मा.श्री.चेतन उईके, विश्वस्त दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधू ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने "आमची दिवाळी वंचितांसाठी" हा सामाजिक उपक्रम महाराष्ट्र व छत्तीसगड राज्याच्या सीमेलगत असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त भागातील सालेकसा तालुक्यातील पत्थराटोला या गावात आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत गावातील ३७ कुटुंबांतील एकूण २९७ गरजू नागरिकांना नवीन वस्त्र, दिवाळी फराळ व मिष्ठान्नाचे वाटप करण्यात आले. तसेच गावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व क्रीडा साहित्य देऊन त्यांच्या शिक्षण व सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्यात आले. या उपक्रमामुळे दुर्गम व आदिवासी भागातील गरजू कुटुंबांना दिवाळीचा आनंद अनुभवता आला तसेच सामाजिक बांधिलकी जपत गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य संस्थेमार्फत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल सर्व सहकार्य करणाऱ्या मान्यवर, स्वयंसेवक आणि नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले.





देशोन्नती

# आमची दिवाळी वंचितांसाठी उपक्रमाचे आयोजन

**देवरी :** दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी आणि सुवर्णप्राशन फाउंडेशन साकोली तसेच मित्र

फाऊंडेशनचे संस्थापक/अध्यक्ष डॉ. सुनील समरीत, चेतन उईके, दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचे ...लदिप लांजेवार, ...सिद्दू , सुनिल बारसे, ...सोमाजी आस्वले, ...बिया, सौ. हितेश्री ...तोष कावरे, रमेश ...ा प्रमुख उपस्थित या ...ोजन करण्यात आले

...मान्यवरांच्या हस्ते ...टोला येथील या ...वळपास गरजू ३७ ... २९७ महिला- ...ालक, दिव्यांग बंधू, ... प्रमुख यांना नवीन ...ळ व मिष्ठान या ...रण करण्यात आले. ...कुटुंबातील लहान व ...ना नवीन कपड्यांसह

शैक्षणिक साहित्य, वितरीत करून अनोख्या रुपात दिवाळी हा सण साजरा करण्यात आला. यापुर्वी ग्राम पत्थराटोला येथे कधीही अशा प्रकारचे उपक्रम झाले नसल्याने लहान बालकांसह ज्येष्ठ वृद्ध महिला आणि पुरुष मंडळी यांच्या चेहऱ्यावर वेगळेहास्य निर्माण उमटतांनाचे चित्र बघावयास मिळाले. तर दिवाळी सारखा महत्वाचा सण साजरा करण्यापासून वंचित असणाऱ्या या कुटुंबाच्या प्रवासात आनंद बघून एक वेगळा आत्मानंद मिळत असल्याच्या भावना आयोजकांकडून व्यक्त केल्या गेल्या. कार्यक्रमाचे संचालन रंजीत धमगाये, प्रास्ताविक चेतन उईके तर आभार दीनबंधू संस्थेचे अध्यक्ष कुलदिप लांजेवार यांनी मानले.

यशस्वीतेसाठी दिपक लांजेवार, विशाल रहिले, शुभम वाडीभस्मे, भूवनेश्वर निर्वाण, सिद्धांत शाहू, अंकुश गुप्ता, गुलशन नाईक, योगेश साखरे, किरणकुमार रामटेके, सीतेश ईश्वर, सुरेश राठी, मनोज कोडापे, धनलाल कुंभरे, विनोद मडावी, विश्वास चौधरी, संदीप नागरिकर, आकाश राऊत यांच्या सह संस्थेच्या स्वयंसेवकांनी आणि ग्रामवासीयांनी सहकार्य केले.

...ndia Edition
...2024 Page No. 8
...d by: erelego.com



लोकमत

चार वर्षांपासून केले जातेय आयोजन : शालेय व क्रीडा साहित्य आणि फराळाचे वाटप

# पत्थरटोला येथे आमची दिवाळी वंचितांसाठी उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**देवरी :** अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणारा भारतीय संस्कृतीतील दिवाळी हा महत्त्वाचा सण, समाजातील प्रत्येक व्यक्ती आपल्या सोयीप्रमाणे साजरा करून घेतात. परंतु समाजात असेही काही घटक आहेत जे हा सण साजरा करण्यापासून वंचित राहतात, अशा वंचित कुटुंबासोबत सहभागी होऊन त्यांच्या आनंदात आनंद मिळवून देण्यासाठी दिनबंधू ग्रामीण विकास संस्था देवरी, सुवर्णप्राशन फाउंडेशन साकोली व मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या चार वर्षांपासून आमची दिवाळी वंचितांसाठी हा उपक्रम राबविला जात आहे.

या लोकाभिमुख उपक्रमाअंतर्गत शनिवारी (दि.२) सालेकसा तालुक्यातील महाराष्ट्र व छत्तीसगड सीमेलगत असलेल्या नक्षलग्रस्त क्षेत्रात वसलेल्या या पत्थराटोला हा कार्यक्रम घेण्यात आला. वीर शहीद बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

पत्थरटोला येथील साहित्य वाटप कार्यक्रमाला उपस्थित सामाजिक कार्यकर्ते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भोजराम हूड हे होते.

यावेळी चेतक झंजाळ, विनोद चौधरी, सुरेश वाघाडे, एस. के. मडावी, आशिष अडमे, तोषलाल लिल्हारे, आर. बी. कुंजाम, डॉ. सुनील समरीत,चेतन उईके, कुलदीप लांजेवार, देवेंद्रपालसिंग सिद्दू , सुनील बारसे, अरविंद फुंडे, सोमाजी आस्वले, संदीप महोबिया, हितेश्री समरीत, संतोष कावरे, रमेश सोनवणे उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पत्थराटोला येथील ३७ गरजू कुटुंबातील २९७ महिला-पुरुष, बालक, दिव्यांग, वृद्ध नागरिक यांना नवीन कपडे, फराळ व मिष्टान्न आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.

बालकांना नवीन कपड्यांसह शैक्षणिक साहित्य, वितरित करून अनोख्या रूपात दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमाने बालकांसह ज्येष्ठ वृद्ध महिला आणि पुरुषांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव झळकले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेतन उईके यांनी मांडले. संचालन रंजीत धमगाये यांनी केले आभार कुलदीप लांजेवार यांनी मानले.

कार्यक्रमासाठी दीपक लांजेवार, विशाल रहिले, शुभम वाडीभस्मे, भुवनेश्वर निर्वाण, सिद्धांत शाहू, अंकुश गुप्ता, गुलशन नाईक,योगेश साखरे, किरणकुमार रामटेके, सीतेशकुमार ईश्वर, सुरेश राठी, मनोज कोडापे, धनलाल कुंभरे, विनोद मडावी, विश्वास चौधरी, संदीप नागरीकर, आकाश राऊत यांनी सहकार्य केले.

**उपक्रमाचे केले जातेय कौतुक**

- या उपक्रमाला यावर्षी ५ वर्षे पूर्ण होत असून संस्थांना आर्थिक मदत, वस्तू आणि इतर स्वरूपात सहकार्य करणाऱ्या दानदात्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्यातून संस्थेअंतर्गत सामाजिक क्षेत्रात हे कार्य सुरु आहे. संस्थेद्वारे आयोजित लोकाभिमुख उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.

Hello Gondia
Page No. 3 Nov 04, 2024
Powered by: erelego.com



नोंदणी क्र. २२६/१४ एफ-१८५६ (गोंदिया)

**DINBANDHU**

**Gramin Vikas sanstha, Deori**

ISO 9001:2015

**दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी**

ता.देवरी जि.गोंदिया.